



# एक्झिमा आणि त्यावरील होमिओपॅथिक उपचार

*त्वचा हा शरीरावर आच्छादलेला सर्वांत मोठा अवयव आहे. त्वचेमुळे घातक पदार्थ तसेच जिवाणूंना शरीरात प्रवेश करण्यास अटकाव केला जातो. तसेच शरीरांतर्गत महत्त्वाच्या द्रव्यांचा अपव्यय रोखला जातो. त्वचेमुळे शरीराचे आघातापासून तसेच सूर्यकिरणांच्या दुष्परिणामांपासून संरक्षण केले जाते. त्याचबरोबर त्वचेमुळे शरीराचे तापमान संतुलित ठेवले जाते. त्वचेचा सर्वांत महत्त्वाचा गुणधर्म म्हणजे मृतपेशींना नवीन पेशींनी भरून काढण्याची क्षमता यामुळे त्वचेवर झालेली जखम, पटकन स्वतःहून भरून काढली जाते.*

त्वचेचा बाह्य व अंतस्थ स्तर असतो. वरचा स्तर हा मृतपेशींचा व केरॅटिन नामक प्रथिनांचा असतो. अंतस्थ स्तर हा संवेदनशील पेशींचा बनलेला असतो. बाह्यस्तरातील केरॅटिनपेशींद्वारा सतत नवीन त्वचापेशींची निर्मिती होत राहते व त्वचेला घट्ट आवरण मिळते. मेलॅनिन पेशींद्वारे त्वचेला रंग मिळतो तर लॅंगरहॅन्स पेशींद्वारे त्वचेला प्रतिकारपेशी मिळतात. कुठलाही बाह्य घटक जसे की, जिवाणू किंवा घातक द्रव्य त्वचेच्या संपर्कात येतात, त्या वेळेस या लॅंगरहॅन्सपेशींद्वारे शरीरातील प्रतिकारसंस्था जागृत होते. प्रथमतः त्वचेतील पेशीअंतर्गत सूज येते. हळूहळू ही पेशीअंतर्गत जागा वाढत जाऊन तेथे पाणी साठते. त्यामुळे त्वचेवर पाण्याने भरलेले फुगवटे जागोजागी येतात. हे फुगवटे येतात आणि जातात. केरॅटिनच्या पेशी वरच्या भागात ढकलल्या जातात. त्यामुळे त्वचेचा पृष्ठभाग खडबडीत होतो. त्वचापेशींमध्ये पांढऱ्या पेशी प्रतिकारपेशींचा शिरकाव होतो. प्रतिकारपेशींतील हिस्टोसाइट्समुळे कंड सुटतो. कालांतराने त्वचापेशी घट्ट होतात. त्यामुळे त्वचेला जाडसरपणा येतो.

याच प्रकाराला आपण इसब म्हणजेच एर्ग्री असे म्हणतो. प्रतिकारसंस्थेतील बिघाडामुळे शरीराची काही बाह्य किंवा अंतस्थ घटकांना संवेदनशीलता वाढवून त्वचादाह निर्माण होतो. इसबमध्ये त्वचा जागोजागी खडबडीत, काळसर, लालसर होऊन त्वचेवर पाण्याने आलेले फोड येऊन अतिप्रमाणात कंड सुटते.

**कारणे** :- इसब या त्वचारोगाचे कारण जनुकीय बिघाड आणि पर्यावरणातील घटक हे एकत्रितरीत्या आहे. पर्यावरणातील घटक :- त्वचादाह निर्माण करणारे घटक हे प्रत्येकासाठी भिन्न भिन्न असू शकतात. जसे की, १. हवेच्या तापमानातील बदल खूप उष्ण किंवा दमट हवामान, अतिव्यायामानंतर घाम येणे, वैगेरे वैगेरे.... २. काही जिवाणू, विषाणू किंवा बुरशीच्या प्रादुर्भावामुळे कंड चालू होतो. ३. भिंतीला आलेली बुरशी, प्राण्यांचे केस, परागकण यामुळेही इसब चालू होऊ शकतो. ४. दूध व दुग्धजन्य पदार्थ, अंडी, गव्हाचे पदार्थ, शेंगदाणे इत्यादी अन्नघटकांमुळेही अशी त्वचेची ॲलर्जी निर्माण होऊ शकते. ५. काही औषधांचे दुष्परिणाम. ६. मानसिक ताणतणाव व संप्रेरकांमधील बदल यामुळेही त्वचादाह उद्भवतो. जनुकीय कारणे :- अनुवांशिकता हेदेखील महत्त्वाचे कारण आहे. अटॉपी म्हणजे जनुकामध्ये पूर्वजांकडून आलेली अवस्था. यामध्ये शरीरात मोठ्या प्रमाणात कॅ अ प्रतिपिंडे तयार होतात. ही प्रतिपिंडे काही केमिकल्स, धूर किंवा प्रदूषणाच्या संपर्कात आल्यावर शरीरात तयार होतात. यामुळे अशा लोकांची अतिसंवेदनशीलता काही आजारांना जसे की दमा, ॲलर्जिक सर्दी, त्वचेवर गांधी उठणे तसेच इसब यांसाठी कारणीभूत ठरतात.

**लक्षणे** :- १. शरीरावर कुठल्याही ठिकाणी चट्टे येऊन त्वचा सुजणे. २. तीव्र प्रमाणात कंड सुटतो. ३. त्वचा जाडसर होऊन काळवंडणे. ४. त्वचादाह होऊन मानेजवळ, मनगटांत, मांड्या व घोट्याजवळ जखम कधी कधी गुप्तांगावर व्रण उठतात. ५. अटॉपिक त्वचेदाहमध्ये त्वचेला खूप जास्त प्रमाणात कंड सुटतो. त्वचा खूप कोरडी पडते. यामध्ये हाता-पायांच्या फोल्डमध्ये व्रण दिसून येतात. ६. जिवाणू संसर्गानंतर पाण्याने भरलेले लालसर फोड खांदा, गुडघे, नितंब, डोके, तोंड, केस यांवर दिसून येतात.

**वर्गीकरण** :- ज्या ॲलर्जीक घटकाला शरीराची संवेदनशीलता वाढलेली दिसून येते त्यानुसार या आजाराचे वर्गीकरण केले जाते. १. अटॉपिक डरमॅटायटिस :- वरील कारणांत नमूद केल्याप्रमाणे कुटुंबातील व्यक्तींकडून मिळालेली अनुवांशिकता या प्रकारास कारणीभूत ठरते. यामध्ये डोके, गुडघे, नितंब, कोपरा यांवर खाज येते. २. कॉन्टॅक्ट डरमॅटायटिस :- काही केमिकल्सच्या प्रदीर्घ संपर्कात आल्यानंतर अशी त्वचेची ॲलर्जी निर्माण होते.

**उदा** :- सिमेंट, निकेल, सूर्यकिरण इत्यादी. ३. झेरॉटिक इक्जिमा :- या प्रकारात त्वचा अतिशय रुक्ष, कडक होते. त्वचा



होमिओपॅथी
चिकित्सा व उपचार
डॉ. अमरसिंह निकम

अतिशय नाजूक, कोरडी पडून त्यावर चिरा पडतात. हा प्रकार प्रौढांमध्ये जास्त प्रमाणात हिवाळ्यात हातापायांवर दिसून येतो. ४. सिबेर्हिक डरमॅटायटिस :- डोक्यावर अतिप्रमाणात कोंढा सुटतो. त्वचा अतिशय तेलकट होते. त्वचेवर खवले तयार होऊन ते आपोआप सुटू लागतात. बाळांमध्येही हा प्रकार दिसून येतो. ५. डिसहायड्रॉसिस :- यामध्ये हाता-पायाच्या पंजावर, बोटांच्या मध्ये पाण्याने भरलेले, जाडसर, चिरांयुक्त जखमा दिसून येतात. जास्त करून हा प्रकार सतत पाण्यात काम करणाऱ्या गृहिणींमध्ये दिसून येतो. ६. डिस्कॉइड एक्जिमा :- वतुर्ळाकार कोरड्या जखमा त्वचेवर जास्त करून पायांवर दिसून येतात. ७. व्हिनस इक्जिमा :- पायांवरील व्हेरीकोज व्हेन्स म्हणजेच शिरांमधील फुगवट्यानंतर पायावर अल्सर होतात. ८. डरमॅटायटिस हरपेटीफॉर्मिस :- हात, मांड्या, पाठ, गुडघे यांवर एकाच वेळी दोन्ही बाजूंवर जखमा होतात. अशा जखमा पुन्हा पुन्हा होऊ शकतात. ९. न्यूरोडरमॅटायटिस :- यामध्ये मानसिक ताणतणावांमुळे सतत त्वचा खाजवून, चोळून चोळून जखमा तयार होतात.

पारंपरिक औषधोपचारामध्ये कुठल्याही त्वचेवर दिसून येणाऱ्या आजारावर मलम, स्टॅराइडच्या क्रिम्सचा वापर केला जातो. त्वचा हा शरीराचा अविभाज्य भाग आहे. शरीरांतर्गत प्रतिकारसंस्थेतील बिघाडामुळे त्वचेवर प्रतिकारपेशींचा हल्ला होऊन इसबची लक्षणे दिसून येतात. म्हणजेच शरीरांतर्गत बिघाडाचे लक्षण त्वचेवर दिसून येते. मग त्वचेवर वरवरचा मलम लावून हा अंतस्थ बिघाड बरा होऊ शकेल काय? नाही ना? मग मलमांचा वापर त्वचाविकारांवर बाहेरून करणे किती घातक आहे हे तुमच्या लक्षात येईल? त्वचाविकारात मलमांचा सर्रास बाह्य वापर करून मूळ आजार दडपला जातो व त्याची लक्षणे दुसऱ्या भागात किंवा महत्त्वांच्या अवयवांवर रूपांतरीत होतो व घातक आजारांची निर्मिती होते. यालाच आपण औषधजन्य दडपशाही असे म्हणतो. या दडपशाहीचे उदाहरण म्हणजे त्वचेवरील खाज, पुरळ मलमांचा वापर करून दडपल्यानंतर कालांतराने दम्याचा त्रास सुरू होणे.

होमिओपॅथीमध्ये व्यक्तीचा सर्वांगीण विचार करून अंतर्गत औषध दिले जाते. त्यामुळेच आजार दडपला न जाता तो बाहेर पडत जातो व शारीरिक, मानसिकदृष्ट्या रुग्ण बरा होतो. तेही कुठल्याही मलमांशिवाय.

**केस** - ही एक २६ वर्षांच्या महिलेची केस आहे. जिला दोन वर्षांपासून इसबचा त्रास चालू झाला. त्यासाठी जखमांवर सतत मलमांचा वापर करूनदेखील नवीन जखमा एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी उद्भवत होत्या. सतत त्वचेवर उमटणारी खाज आणि काळवंडलेली, भेगा पडलेली त्वचा तसेच लग्नानंतर लगेचच तक्रारींना सुरुवात झाल्यामुळे त्या खूप निराश झालेल्या होत्या. कुठल्याच औषधांनी फरक पडत नसल्यामुळे त्यांनी होमिओपॅथिक औषध सुरू करण्याचा निर्णय घेतला.

**तक्रारी** :- १. त्वचेवर जखमा दोन वर्षांपासून - जखमांना सुरुवात उजव्या हातावर, मानेवर, उजव्या घोट्यावर, उजव्या गुडघ्यावर, नंतर डाव्या गुडघ्यावर, डाव्या घोट्यावर, डाव्या कोपऱ्यावर झाली. जखमांवर प्रचंड प्रमाणात खाज सुटणे, खाजवल्यानंतर त्वचेवर अतिशय प्रमाणात दाह निर्माण होणे, कालांतराने जखमांवर चिरा पडणे, चिरांमधून रक्तस्राव होणे, जास्त करून हिवाळ्यात साबणाच्या वापरामुळे, उन्हात गेल्यावर त्वचेवर जखमा उमटणे. रात्रीच्या वेळी, हिवाळ्यात, झोपेत कंड जास्त प्रमाणात सुटणे. खाजवल्यानंतर बरे वाटणे. २. जुनाट ॲसिडिटीचा त्रास चार वर्षांपासून - छातीत जळजळ होऊन पिवळसर घाणेरडा वास येणारी उलटी होणे. उन्हामुळे, दुपारच्या वेळी जास्त करून ॲसिडिटी वाढणे. वमनानंतर, थंड पदार्थ खाल्ल्यानंतर बरे वाटणे. ३. जुनाट डोकेदुखीचा त्रास ५. वर्षांपासून - ऊन लागल्यानंतर, प्रवासामुळे, उपाशी राहिल्यानंतर, उग्रवासामुळे, दुपारी ११ ते २ च्या सुमारास डोकेदुखी सुरू होणे. उलटी काढल्यानंतर, डोके दाबल्यानंतर बरे वाटणे. ४. केस गळणे व डोक्यात कोंढा होणे, दोन वर्षांपासून - थंडीच्या आणि उन्हाळ्याच्या दिवसांत केस गळती होणे. कोंढ्यामुळे डोक्यात खाज सुटणे. डोक्यात खाज जास्त करून दुपारी ११ ते २ च्या दरम्यान होणे.

**विशेष माहिती** :- १ भूक सहन न होणे. २ खाण्यात गोडाची, थंड पेयाची आवड. ३. उन्हाळ्यात नाकातून अधूनमधून रक्तस्राव होणे. ४. कपाळावर जास्त करून घाम येणे. ५. सततच्या विचारामुळे अस्वस्थ झोप लागणे. ६. उष्ण प्रकृती.

**स्वभाव** :- तुमच्या लहानपणाबद्दल सांगा - मला एक मोठा भाऊ आहे. आमचं छोटंसं कुटुंब होते. माझा स्वभाव खूप बोलका, पटकन इतरांमध्ये मिसळणारा होता. अभ्यासातसुद्धा मी खूप हुशार होते. परंतु, प्रत्येक परीक्षेच्या वेळी मला सतत भीती वाटत असे. मला खूप मित्रमैत्रिणी होत्या. प्रत्येकाबरोबर गप्पा मारायला, मज्जा-मस्करी करायला मला आवडते. कोणी मला विरोध केला किंवा माझ्यावर धाक दाखवण्याचा प्रयत्न केला तर ते मला सहन होत नाही. अशाप्रसंगी मी त्या व्यक्तीशी बोलणेच बंद करते.

तुमच्या स्वभाव, ताणतणावाविषयी सांगा - माझे दोन वर्षांपूर्वी लग्न झाले. आमचे एकत्र कुटंब आहे. मी इंजिनिअरिंगमध्ये माझे शिक्षण पूर्ण केले व जॉबदेखील करत होते. नुकताच एक महिना झाला असेल मी माझा जॉब सोडून दिला. कारण माझ्या सासूबाई खूप कडक स्वभावाच्या आहेत. त्या सतत मला घालूनपाडून बोलत राहतात. मी सुशिक्षित असूनदेखील मला त्यांचा हा स्वभाव सहन करावा लागतो. त्यांचे बोललेलं सतत मनाला लागून राहते. या गोष्टींमुळे माझी सतत आतल्याआत चिडचिड होत राहते. मला माझं करिअर सोडून द्यावं लागतं याचदेखील वाईट वाटत राहतं.

**संपूर्ण व्यक्तिमत्त्व** :- १. दडपला गेलेला स्वभाव. २. अपेक्षाभंग ३. अपमान सहन न होणे. ४. वर्चस्व सहन न होणे. ५. भूक सहन न होणे. ६. खाण्यात गोडाची, थंडपेयांची आवड. ७. उन्हाळ्यात, दिवसा तक्रारींमध्ये वाढ होणे. ८. कपाळावर घाम येणे. ९. उन्हाळ्यात त्वचेचा त्रास वाढणे. १०. त्वचेवर जखमांमध्ये चिरा पडून रक्तस्राव होणे. ११. दुपारच्या वेळी, आंघोळ केल्यानंतर, उन्हाळ्यात कंड जास्त प्रमाणात सुटणे. १२. उष्ण प्रकृती.

**प्रतिसाद** :- होमिओपॅथीला कुठल्याही वरवरचा उपचार म्हणजेच मलम, क्रिम्सचा बाह्योपचार मान्य नसल्या कारणाने प्रथमतः त्यांना मी सगळ्या मलमांचा वापर बंद करण्यास सांगितले. होमिओपॅथिक औषधाच्या गोळ्या सुरू करून मी त्यांना १५ दिवसांनी फेरतपासणीसाठी बोलावले. फेरतपासणीत त्यांच्या त्वचेवर पडलेल्या भेगा भरून आलेल्या आढळल्या. रक्तस्राव थांबला होता, कंडांचे प्रमाण कमी झाले, रुक्षपणा कमी झाला, त्वचेचा काळवंडलेपणा हळूहळू कमी होत गेला. त्याचबरोबर रुग्णाला स्वस्थ झोप लागू लागली. सततच्या नियमित उपचारांनंतर रुग्णाच्या संपूर्ण जखमा ७ ते ८ महिन्यांत कुठल्याही मलमांशिवाय आणि बाह्य उपचारांशिवाय बऱ्या झाल्या आणि उद्भवल्या नाहीत.

आदित्य होमिओपॅथिक हॉस्पिटल,
हनुमान मंदिराजवळ, स/नं. ३०९/१/२, शिवाजी चौक, पिंपरी गाव, पुणे -१७
फोन नंबर - ०२०-२७४१२१९७/२७४१२५४९

## बारामतीत 'हिपॅटायटिस-सी'ची जनजागृती

**। बारामती : प्रतिनिधी**

हिपॅटायटिस-सी या गंभीर आजाराच्या जनजागृतीसाठी येथील डॉ. एस. एच. कायमखानी यांनी पुढाकार घेतला असून सर्वसामान्यांच्या मोफत तपासणीचा उपक्रम रविवारपासून (दि. २० डिसेंबर) बारामतीमध्ये त्यांनी सुरु केला आहे.

या संदर्भात पत्रकार परिषदेत माहिती देताना डॉ. कायमखानी म्हणाले, हिपॅटायटिस-सी हा एक विषाणू आहे. या विषाणूमुळे यकृताचा गंभीर आजार होतो. त्यातून सिरॉसिस, यकृत बंद पडणे, यकृताचा कर्करोग आदी गंभीर आजार होण्याची भिती आहे. जगामध्ये या आजाराच्या रुग्णांची संख्या मोठ्या प्रमाणावर वाढली आहे. भारतातही या आजाराचे रुग्ण मोठ्या प्रमाणावर आढळत आहे. त्यामुळे या आजाराचा संसर्ग जागतिक आरोग्याची ठळक समस्या बनली आहे. चाचणी शिवाय हा आजार ओळखता येत नाही. सुरुवातीला या आजारामध्ये रुग्णांना कोणताही त्रास जाणवत नाही. त्यामुळे चाचण्यांबाबत जागरुकता निर्माण करण्यासाठी मोफत उपक्रम बारामतीमध्ये राबविण्यात येत आहे. या उपक्रमाच्या माध्यमातून रुग्णांची आधुनिक तपासणी या यंत्राद्वारे करण्यात येणार आहे, असे डॉ. कायमखानी यांनी सांगितले.




सिकंदरे आज़म
जगातील सर्वश्रेष्ठ
भारतात सेक्स पावर कॅप्सूल उपलब्ध
नविन विश्वास, एकाच कॅप्सूलने इंद्रियात अविश्वसनीय वाढ व स्फुर्ती नसांची खराबी, शीघ्रपतन, स्वप्न दोष, नपुंसकता दूर करा. मनासारखा सेक्स टाईम मेडीकल स्टोअरमधून खरेदी करा वा फोन करा.
09212358677
09311303434

# पॅलिएटिव्ह केअर सेवेत महाराष्ट्र उदासीन

## वाढता खर्च व अपुऱ्या मनुष्यबळाचा परिणाम

**। पुणे : प्रतिनिधी**

गंभीररीत्या आजारी असणाऱ्या व्यक्तीचे शेवटचे काही दिवस आपल्या कुटुंबीयांसोबत आनंदात व शांततेमध्ये जावेत यासाठी पॅलिएटिव्ह केअर संकल्पना काही रुग्णालयांत व सामाजिक संस्थांद्वारे राबवली जाते. मात्र गेल्या काही वर्षांत वाढलेला वैद्यकीय खर्च व अपुऱ्या मनुष्यबळामुळे रुग्ण चांगल्या सेवेपासून वंचित राहिले आहेत. परिणामी सर्वसामान्य रुग्णाला आपले शेवटचे काही दिवस अत्यंत बिकट परिस्थितीमध्ये काढावे लागत आहेत.

दीर्घ काळापासून किंवा मोठ्या आजाराने त्रस्त रुग्णांचे जीवनमान सुधारण्यासाठी, तसेच कुटुंबाचा त्रास कमी करण्यासाठी विविध स्तरांवर घेतलेली काळजी म्हणजे पॅलिएटिव्ह केअर. दीर्घ काळ असणारे व शारीरिक अपंगत्व आणणाऱ्या व्याधी त्रासदायक असतात. शारीरिक समस्यांसोबतच सामाजिक, भावनिक, आर्थिक आणि आध्यात्मिक त्रासांनासुद्धा सामोरे जावे लागते. पॅलिएटिव्ह केअरमध्ये मुख्यतः आयुष्याच्या शेवटच्या टप्प्यात व कधीच बरे न होणाऱ्या रुग्णांचा समावेश होतो. पॅलिएटिव्ह केअर कॅन्सर, पक्षाघात, एचआयव्ही/एड्स, औषधाने न बरे होणारे क्षयरोग, मतिमंद मुले, वृद्धापकाळाने अपंगत्व आलेले, किडनी विकार, लिव्हर विकारग्रस्त इ. रुग्णांना दिली जाते. रुग्ण आपले स्वतंत्रपणे काहीच करू शकत नसतात. मलमूत्र विसर्जन, अंघोळ किंवा स्पंजिंग करणं, जेवण घालणं हे तर सर्व दुसऱ्या व्यक्तीला करावं लागतं. अशा रुग्णांची प्रकृती हळूहळू ढासळत जाते. अशा रुग्णांसाठी तीन-चार मदतनीसांची गरज असते. हे सर्व उभं करणं रुग्णाच्या कुटुंबीयांसाठी आव्हानात्मक आणि खर्चिक ठरतं. पुण्यासारख्या शहरात अशा रुग्णांसाठी २४ तास प्रशिक्षित नर्स ठेवण्याचा खर्चच महिन्याला ४८-५० हजार रुपयांचा असतो. सामान्य आर्थिक कुवतीच्या कुटुंबासाठी हा न झेपणारा खर्च असतो. हे चित्र कमी-जास्त प्रमाणात इतर शहरांतही पाहायला मिळते.

*गेल्यावर्षी इंडियन असोसिएशन ऑफ पॅलिएटिव्ह केअर आणि इंडियन सोसायटी ऑफ क्रिटिकल केअर मेडिसिन या संस्थांतर्फे पॅलिएटिव्ह केअरसंदर्भात मार्गदर्शक तत्त्वे मांडण्यात आली.पण याची अंमलबजावणी करण्यासाठी पॅलिएटिव्ह केअर संदर्भात व्यापक राष्ट्रीय धोरणाची गरज आहे. याशिवाय डॉक्टर्स व नर्सेसनादेखील प्रशिक्षण देणे आवश्यक आहे.*

***- प्रियदर्शिनी कुलकर्णी,***
***इंडियन असोसिएशन ऑफ पॅलेएटिव्ह केअरच्या मानद सचिव***

राज्यात पॅलिएटिव्ह केअर सेवा यंत्रणेची अधिक गरज आहे. राज्यात दरवर्षी साधारणपणे गंभीर आजाराने ५ लाख नागरिक मरण पावतात. यापैकी ६० टक्के मृत्यू हे दीर्घकालीन दुर्धर आजारांमुळे होतात. या सर्वांना म्हणजे दरवर्षी सुमारे ६० लाख नागरिकांना या सेवेची आवश्यकता असते. ही सेवा पुरेशा प्रमाणात उपलब्ध नसल्याने केवळ या रुग्णांचीच परवड होते असं नाही, तर त्यांच्या कुटुंबीयांची अवस्थाही बिकट होते.



Ayurex-Ndx
त्वरित
घ्या
असरदार
स्टॅमिना
साठी आयुर्वेदीक कॅप्सुल
एक कॅप्सुल एक तास आधी
साध्या पाण्या सोबत जेवणाच्या
कृपया अविवाहीत पुरूषांनी ह्याचा वापर करू नये.
आयुरेक्स एनडीएक्स सर्व मेडीकल स्टोर्स मध्ये उपलब्ध.

Govt Reg.No.7342
पेन केअर सेंटर
मुंबई, पुणे, नगर, नाशिक, औरंगाबाद
विना ऑपरेशन विना दुष्परिणाम
जॉईंट ॲण्ड स्पाईन


पेन मोड्युलर इंजेक्शन थेरेपी
या पध्दतीमध्ये काही विशिष्ट बिंदुना इंजेक्शन देऊन नसावरील दाब, सुज कमी करण्यात येते. ही पध्दत ज्यांना कमरेचे किंवा मानेचे ऑपरेशन सांगितले आहे ते टाळण्यासाठी एक वरदान ठरले आहे. या इंजेक्शन व्दारे सांध्याचे ल्युब्रीकेशन वाढुन सांधे बदलण्याचे ऑपरेशन टाळता येतात. या पध्दतीमुळे सांधेवातासाठी लागणाऱ्या गोळया ९० टक्यांपर्यंत कमी करता येतात. या इंजेक्शनचे कोणतेही साईड इफेक्ट नाहीत.
अत्याधुनिक अल्टरनेटीव्ह, हायटेक उपचार
जॉईंट ल्युब्रीकेशन थेरेपी (वेळ - स.८ ते दु. ३)
पुणे - जंगली महाराज रोड, हॉटेल शुभमच्या पाठीमागे, दुर्गाशंकर बिल्डींग
(कृपया अपॉईंटमेंट घेऊनच येणे) महिन्यातुन अल्टरनेट दोन रविवार
मो. 9420808990, 9403354523, 9822899660

विवाहापुर्वी व विवाहानंतर समस्यांसाठी
सेक्स तज्ञांचा सल्ला व
आयुर्वेदिक औषधी उपलब्ध

हस्तमैथुन, स्वप्नदोष, विर्यदोष, शिघ्रपतन, शिथिलता, हायपोगोनॅडिझममुळे लहान लिंग,
मधुमेहामुळे आलेली लैंगिक शिथीलता
ऑलीगोस्पर्मीया : विर्यामध्ये शुक्रजंतुची संख्या कमी असणे.
ॲझुस्पर्मीया : शुक्रजंतुची संख्या अजीबात नसणे.
आशाकिरण क्लिनीक
गुलाब पॅव्हेलीयन, दुसरा मजला,डेक्कन बस स्टॉपच्या मागे, डेक्कन, पुणे. वेळ - ११ ते ६ पर्यंत.
7875451644, 8657122333
औषधीसाठी. संपर्क - 7769856821

## श्वासनलिकेवर यशस्वी शस्त्रक्रिया

**। पुणे** : श्वसनाचा त्रास होत असणाऱ्या एका ३९ वर्षीय महिलेवर गुंतागुंतीची शस्त्रक्रिया नुकतीच करण्यात आली. रुग्णालयात तब्बल ७.३० तास सुरू असलेली ही अवघड शस्त्रक्रिया यशस्वीपणे पार पडली. रुग्णाची १ इंच ब्लॉक असलेली श्वासनलिका काढून त्यावरची व खालची चांगली श्वासनलिका जोडण्याची शस्त्रक्रिया करण्यात आली आहे. यामुळे त्या महिलेला आता सुरळीत श्वास घेणे शक्य झाले आहे.

शहरातील पूना हॉस्पिटलमधील कान, नाक, घसातज्ज्ञ आणि हेड अँड नेक सर्जन डॉ. विनया चितळे यांनी ही शस्त्रक्रिया केली आहे. डॉ. निखिल गोखले यांनी साहाय्य केले. भूलतज्ज्ञ म्हणून डॉ. श्रीकांत निलेगावकर यांनी कामगिरी केली. श्वासनलिका ७० ते ७५ टक्के ब्लॉक झाल्याने काही पावले अंतर चालल्यावर संबंधित महिलेस दम लागत असे. शस्त्रक्रियेदरम्यान बारीक झालेला भाग काढून पुन्हा जोडण्यात आला. या प्रकारचा रुग्ण २ लाखांमध्ये एखादाच आढळतो.

डॉ. चितळे म्हणाल्या, स्वरयंत्राला हलविणारी नस श्वासनलिकेच्या अगदी जवळ असते. त्याला धक्का लागल्यास स्वरतंतू हलणार नाहीत. स्वरतंतू हलल्यास रुग्णाला श्वास घेता येणार नाही. तसेच अन्ननलिका श्वासनलिकेच्या पाठीमागे असल्याने तिला धक्का लागल्यास रुग्णाला काहीही खाता-पिता येत नाही.